THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 2ND MARCH 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टासंबंधी आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थी सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टासंबंधी आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या अक्टास सन १८९३ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टासंबंधी आक्ट असें ह्मणावें; आणि सरनामा व सुरुवात.

(२) तो च्या पहिल्या तारखेस अमलांत येईल.

२. सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टासंबंधी आक्ट कीं ज्यास यांत "सदर्हू आक्ट" असें ह्मटलें आहे त्याच्या ७व्या कलमाच्या पहिल्या पारिग्राफांतील "मात्र याप्रमाणें" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या विशेष ठरावाच्या बदला खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या ७ व्या कलमाची सुधारणूक.

"मात्र कोणत्याहि मनुष्यास अशा कोर्टाचा जज्ज ह्मणून नेमणें तो किंवा अशा कोर्टाच्या जज्जाचे अधिकार चालविण्याचा अखत्यार देणें तो त्या मनुष्यानें पांच वर्षेपर्यंत—

(अ) इंग्लंडचा किंवा आयर्लंडचा बॉरिस्टर या नात्यानें अगर स्कॉटलंडांतील फाकल्टी ऑफ् आडवोकेट्सचा मेंबर या नात्यानें, किंवा

(ब) सन १८६१ च्या हिंदुस्तानच्या हाय् कोर्टाविषयींच्या आक्टाअन्वयें स्थापन केलेल्या न्यायाधिकारी हाय् कोर्टाचा आडवोकेट, वकील किंवा अटर्नी या नात्यानें, किंवा

(क) दिवाणी न्यायाधिकारी कोर्टाचा जज्ज या नात्यानें, किंवा

(ड) कांहीं अंशीं सदर्हूपैकीं एका हुद्याचें व कांहीं अंशीं दुसऱ्या हुद्याचें,

काम केलेलें नसल्यास नेमूं नये किंवा देऊं नये :

आणि सदरीं सांगितलेल्या मुदतीपर्यंत काम केलेला बारिस्टर, सदर्हू फाकल्टी ऑफ् आडवोकेट्सचा मेंबर, किंवा हाय् कोर्टाचा आडवोकेट यांखेरीज इतर कोणत्याहि मनुष्यास अशा कोर्टाचा चीफ् जज्ज ह्मणून नेमूं नये."

(२) सदर्हू आक्टाच्या ७व्या कलमाचा शेवटचा पारिग्राफ या कलमावरून रद्द केला आहे.

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या ९ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें व विद्यमान काम चालविण्याची रीति व रिवाज कांहीं मुदतीपर्यंत चालू ठेवणें.

३. सदर्हू आक्टाच्या ९व्या कलमाच्या बदला खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे:—

स्मॉल कॉज कोर्टाची काम चालविण्याची रीति व त्याचा रिवाज.

"९. (१) हाय् कोर्ट वेळोवेळीं, कायद्याप्रमाणें चालणाऱ्या कानू करून,—

(अ) स्मॉल कॉज कोर्टाच्या काम चालविण्याच्या रीतीच्या संबंधानें किंवा त्याच्या रिवाजाच्या संबंधानें जे कोणतेहि ठराव सन १८९२ च्या डिसेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वीं, सन १८८२ चा इलाख्यांतील स्मॉल कॉज कोर्टासंबंधी आक्ट किंवा विवक्षित काळीं अमलांत असलेला कोणताहि इतर कायदा, यांत अगर याअन्वयें केलेले असतील ते ठराव रद्द करून किंवा त्यांशिवाय आणखी, स्मॉल कॉज कोर्टानें कोणत्या रीतीनें काम चालवावें व त्या कोर्टाचा रिवाज कसा असावा याबाबद ठराव करण्यास, आणि

(ब) अशी कोणतीहि कानू अगर अशा कोणत्याहि कानू रद्द करण्यास किंवा फिरविण्यास,

मुखत्यार आहे.

"या कलमाअन्वयें करावयाच्या कानूंमध्यें, दुसऱ्या बाबतींबरोबर, या आक्टावरून किंवा विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि इतर कायद्यावरून स्मॉल कॉज कोर्टास दिलेले कोणतेहि अधिकार स्मॉल कॉज कोर्टाच्या एका जज्जानें चालवावयाचे किंवा अधिक जज्जांनीं चालवावयाचे याबद्दलहि ठराव करण्याचा अखत्यार आहे."

(२) स्मॉल कॉज कोर्टांत सन १८९२ च्या डिसेंबर महिन्याच्या एकतिसाव्या तारखेरोजीं अमलांत असलेला किंवा अमलांत असल्याप्रमाणें मानलेला काम चालविण्याच्या रीतीसंबंधी किंवा रिवाजासंबंधी कायदा आणि त्याअन्वयें केलेल्या अगर केलेल्या असें ह्मटलेल्या कोणत्याहि कानू व ठराव हीं, या कलमाअन्वयें हाय् कोर्टानें केलेल्या कानूंवरून रद्द केलीं नाहींत किंवा फिरविलीं नाहींत तर व रद्द केलीं किंवा फिरविलीं जात तोंपर्यंत, अमलांत राहतील.

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या १८ व्या कलमांत ज्यास्त मजकूर दाखल करणें.

४. सदर्हू आक्टाच्या १८ व्या कलमानंतर खालीं लिहिलेलें कलम दाखल करावें, ह्मणजे :—

हुकुमतीच्या बाहेर राहणाऱ्या प्रतिवादींच्या संबंधाचा दावा सोडून देण्याचा वादीस अधिकार आहे.

"१८ अ. फिर्यादीचें कारण सर्वस्वी किंवा अंशतः कोर्टाच्या हुकुमतीच्या स्थानिक मर्यादेच्या आंत उपस्थित झालें असून त्या फिर्यादीच्या कारणावरून ज्या दाव्यांत प्रत्येक मनुष्यावर निरनिराळी जबाबदारी आहे असें ह्मणणें असेल त्या दाव्याच्या पहिल्या चौकशीच्या वेळीं किंवा त्यापूर्वीं वादीला, जो कोणताहि प्रतिवादी अशा स्थानिक मर्यादेच्या आंत राहत नसेल अगर काम चालवीत नसेल, अगर अर्जनासाठीं जातीनें श्रम करीत नसेल त्याच्या संबंधाचा दावा सोडूं देण्यास व जे प्रतिवादी सदर्हू-

प्रमाणें राहत असतील, काम चालवीत असतील अगर अर्जनासाठीं जातीनें श्रम करीत असतील त्यांजवरच मात्र हुकुमनामा मिळण्याविषयीं फिर्याद करूं देण्यास स्मॉल कॉज कोर्ट मुखत्यार आहे."

५. सदर्हू आक्टाच्या १९ व्या कलमानंतर खालीं दिलेलें कलम दाखल करावें, ह्मणजे:— सन १८८२च्या १५व्या आक्टाच्या १९व्या कलमांत ज्यास्त मजकूर दाखल करणें.

फिर्यादअर्जी परत करणें.

"१९ अ. जेव्हां वादीचा हक्क व स्मॉल कॉज कोर्टांत त्यानें मागितलेली दाद हीं, स्थावर मिळकतींतील कोणताहि हक्क किंवा हितसंबंध अगर त्या कोर्टांत अखेर ठरवितां येत नाहीं असा कोणताहि इतर वारसा शाबीत होण्यावर किंवा नाशाबीत होण्यावर अवलंबून असतील तेव्हां त्या कोर्टास, चालविलेलें काम चालत असतां कोणत्याहि वेळीं, फिर्यादअर्जी, वारसा ठरविण्याची हुकुमत असणाऱ्या कोर्टास हजर करण्यासाठीं परत करण्याचा अधिकार आहे. तें कोर्ट याप्रमाणें फिर्यादअर्जी परत करील तेव्हां त्या कोर्टानें सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ५७ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांतील ठरावांस अनुसरून वहिवाट केली पाहिजे व आपणास योग्य वाटेल तसा खर्चाबाबद हुकुम केला पाहिजे, आणि तें कोर्ट, सन १८७७ चा हिंदुस्तानचा मुदतीविषयींचा आक्ट याच्या कारणांसाठीं, हुकुमतींत व्यंग असल्याच्या कारणानें तो दावा घेण्यास असमर्थ आहे असें समजलें पाहिजे. जेव्हां याप्रमाणें परत केलेली फिर्यादअर्जी पुढें हाय् कोर्टास हजर करण्यांत येईल तेव्हां, हाय् कोर्टाच्या रिवाजाप्रमाणें ज्या फी सरकारच्या खातीं जमा करण्यांत येतात तशी कोणतीहि फी वसूल करतेवेळीं, त्या फिर्यादअर्जीच्या संबंधानें जी कोर्टफीची रकम स्मॉल कॉज कोर्टांत दिलेली असेल ती वादीस मजुरा दिली पाहिजे.

६. सदर्हू आक्टाचें २३ वें कलम व दुसरें परिशिष्ट हीं यावरून रद्द केलीं आहेत. सन १८८२च्या १५व्या आक्टाचें २३ वें कलम व दुसरें परिशिष्ट रद्द करणें.

७. सदर्हू आक्टाच्या ६ व्या बाबीच्या बदला खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— सन १८८२च्या १५व्या आक्टाच्या ६ व्या बाबीच्या ऐवजीं नवीन बाब दाखल करणें.

"बाब ६.

"नवीन इन्साफ व अपिलें.

"३७. या बाबीवरून किंवा विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि दुसऱ्या कायद्यावरून इतर रीतीनें ठरविलें असेल तो प्रसंग खेरीज करून बाकी प्रसंगीं स्मॉल कॉज कोर्टानें दाव्यांत केलेला प्रत्येक हुकुमनामा किंवा हुकुम अखेरचा व कायमचा असेल असें समजावें. स्मॉल कॉज कोर्टाचे हुकुमनामे व हुकुम प्रायशः अखेरचे असणें.

"३८. दाव्याविषयीं तकरार असेल तेव्हां, त्या दाव्यांत (सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ५२२ व्या कलमाअन्वयें केलेला हुकुमनामा नव्हे असा) हुकुमनामा किंवा हुकुम झाल्याच्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंत दोघांतून कोणत्याहि एका पक्षकारानें अर्ज केला असतां स्मॉल कॉज कोर्टाला, आपणास वाजवी वाटतील त्या शर्तीवर नवीन इन्साफ करण्याविषयीं हुकुम करण्याचा, किंवा हुकुमनामा अगर हुकुम बदलण्याचा, रद्द करण्याचा किंवा फिरविण्याचा अधिकार आहे, आणि तें कोर्ट दरमियान पुढें काम चालविण्याचें तहकूब ठेवण्यास मुखत्यार आहे. तकरारीच्या खटल्यांचा नवीन इन्साफ.

मात्र असें ठरविलें आहे कीं ज्या कोणत्याहि दाव्यांत या आक्टाच्या या पुढील कलमाअन्वयें हाय कोर्टास अपील चालेल त्या दाव्यास या कलमांतील कोणताहि ठराव लागू होतो असें समजूं नये.

**खुलासा.**—ज्या दाव्यांत हुकुमनामा प्रतिवादीच्या संमतीशिवाय किंवा प्रतिवादीनें हजर होण्यास कसूर केली नसून केला असेल तो प्रत्येक दावा तकरारीचा दावा आहे असें मानलें पाहिजे.

कित्येक खटल्यांमधील हुकुमनाम्यांवर व हुकुमांवर अपिलें.

"३९. विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कायद्यावरून इतर रीतीनें ठरविलें असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, ज्या दाव्यांतील विषयाची रकम अगर किंमत एक हजार रुपयांहून जास्त असेल अशा कोणत्याहि दाव्यांत स्मॉल कॉज कोर्टानें केलेल्या प्रत्येक हुकुमनाम्यावर हाय कोर्टास अपील चालेल असें समजावें.

सदरील शेवटच्या कलमाअन्वयें अपील होण्याजोग्या हुकुमनाम्यांच्या व हुकुमांच्या संबंधानें नियम.

"४०. (१) ज्या दाव्यांतील होणाऱ्या हुकुमनाम्यावर सदरील शेवटच्या कलमाअन्वयें हाय कोर्टास अपील चालावयाचें असेल अशा कोणत्याहि दाव्याची चौकशी चालल्या वेळीं स्मॉल कॉज कोर्टाच्या जज्जानें पुराव्याच्या सारांशाचें टिपण व आपल्या ठरावाचीं तपशीलवार कारणें लिहून ठेविलीं पाहिजेत.

"(२) हाय कोर्टानें आपली मूळ हुकुमत चालवून केलेल्या हुकुमनाम्यावर अपील करण्यासाठीं कायद्यावरून जी मुदत ठरविली आहे तितकीच मुदत सदरील शेवटच्या कलमाअन्वयें हाय कोर्टास करावयाच्या अपिलाच्या बाबतींत आहे असें समजावें; आणि अशी मूळ हुकुमत चालवून हाय कोर्टानें केलेल्या हुकुमनाम्यावरील अपिलाच्या संबंधाचे व त्यास अनुषंगिक असे जे अधिकार व जी हुकुमत हाय कोर्टास आहे तेच सर्व अधिकार व तीच सर्व हुकुमत हाय कोर्टास सदर्हू प्रत्येक अपिलाच्या बाबतींत आहे असें समजावें."

जप्त मिळकतीवर कोणी हक्क सांगितल्यास त्याची चौकशी करणें हें दाव्याचा इन्साफ करणें होय.

८. सदर्हू आक्टाच्या १४व्या कलमाचा अर्थ करते वेळीं, स्मॉल कॉज कोर्टाच्या हुकुमनाम्याच्या बजावणींत जप्त झालेल्या कोणत्याहि मिळकतीवर जो कोणताहि हक्क सांगण्यांत येईल त्याची अगर त्या मिळकतीच्या जप्तीस जी कोणतीहि हरकत दाखविण्यांत येईल तिची चौकशी करणें हें दाव्याचा इन्साफ करणें होय असें मानावें.

फिर्यादअर्ज्यांवर किंवा प्रोसेसींकरितां घ्यावयाच्या फी.

९. सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टासंबंधी आक्ट याच्या १०व्या बाबींत कसाहि ठराव असला तथापि, स्थानिक सरकार, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन,—

(१) स्मॉल कॉज कोर्टास हजर केलेल्या फिर्यादअर्ज्यांवर ज्या फी घ्यावयाच्या त्यांचें नियमन सन १८७० चा कोर्टाचे फीचा आक्ट याची बाब ३ व परिशिष्ट १ यांवरहुकुम करावें; किंवा

(२) स्मॉल कॉज कोर्टानें काढलेल्या अगर स्मॉल कॉज कोर्टाच्या हुकुमाअन्वयें किंवा निर्बंधाखालीं लागू केलेल्या अगर बजाविलेल्या प्रोसेसी लागू करण्याकरितां किंवा बजाविण्याकरितां ज्या फी घ्यावयाच्या त्यांचें नियमन सन १८७० चा कोर्टाचे फीचा आक्ट याच्या ४थ्या बाबीवरहुकुम करावें,

असें स्थानिक सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, ठरविण्यास मुखत्यार आहे;

आणि मग प्रसंगानुसार फिर्यादअर्ज्यांवर किंवा प्रोसेसींकरितां ज्या फी घ्यावयाच्या त्यांचें नियमन त्याप्रमाणें केलें पाहिजे.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

१. हा जो मसुदा हल्लीं परवानगी घेऊन कौन्सिलापुढें आणला आहे त्याच्या २ ऱ्या कलमाचा हेतु असा आहे कीं इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टाचे जज्ज ह्मणून, किंवा त्या जज्जांचे अधिकार चालविण्यासाठीं, ज्या मनुष्यांस नेमावयाचें त्यांचे अंगीं कोणत्या प्रकारची लायकी असली पाहिजे हें सन १८८२ च्या १५ व्या आक्टांत ठरविलें आहे त्याहून अधिक बरोबर रीतीनें ठरवावें.

२. ३ ऱ्या कलमाचा परिणाम असा होईल कीं त्यावरून, इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टांच्या काम चालविण्याच्या रीतीसंबंधी व त्या कोर्टांच्या रिवाजासंबंधी कानू करण्याचे सर्व अधिकार हाय कोर्टास प्राप्त होतील.

हें कलम, कलकत्त्याच्या न्यायाधिकारी हाय् कोर्टाचे मेहरबान चीफ् जस्टिस व इतर जज्ज यांच्या अभिप्रायास अनुसरून तयार केलें आहे; हा अभिप्राय त्या कोर्टाच्या रेजिस्ट्राराकडून आलेल्या पत्र नंबर १३८३, तारीख १ माहे जून सन १८९१, याच्या ज्या पारिग्राफांत दर्शविला आहे त्या पारिग्राफाचा उतारा खालीं दिला आहे, तो येणेंप्रमाणें:—

"२. हल्लीं ज्या पत्राचें उत्तर लिहिण्यांत येत आहे त्या तुमच्या पत्राच्या बाराव्या पारिग्राफांत केलेल्या प्रश्नाकडे पहिल्यानें लक्ष्य देणें सोईचें होईल असें या कोर्टाच्या जज्जांना वाटून त्या संबंधानें असें लिहिण्याविषयीं मला हुकुम झाला आहे कीं सिव्हिल प्रोसीजर कोड हा आधारभूत ठेवावा आणि स्माल कॉज कोर्टाच्या काम चालविण्याच्या रीतीचें हाय कोर्टाकडून नियमन करण्यांत यावें हें जसें आली जनाब इन् कौन्सिल यांना इष्ट वाटतें तसेंच या कोर्टाच्या जज्जांनाहि वाटतें. त्यांचें असें मत आहे कीं व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या ४४ व्या व ४५ व्या वर्षांतील स्टाटयुटाचा चापूटर ६८, कलम २७, यांतील ठराव सख्त लागू केल्यानें इष्ट हेतु जावा तसा सिद्धीस जाणार नाहीं. परंतु त्यांचें असें अनुमान आहे कीं त्या स्टाटयुटावर हवाला दिला आहे तो मागील दाखल्यासाठीं नसून केवळ उपमेसाठीं दिला आहे, व वास्तव त्यांची असें सांगण्याची इच्छा आहे कीं सिव्हिल प्रोसीजर कोडांतील ठरावांवरून जी काम चालविण्याची रीति ठरविली आहे ती रद्द करून किंवा तिच्या शिवाय आणखी, कायद्याप्रमाणें चालणाऱ्या कानू करून त्यांवरून स्मॉल कॉज कोर्टाकरितां काम चालविण्याची रीति ठरविण्याचा व पुढें अनुभवावरून आढळून येईल त्याप्रमाणें वेळोवेळीं त्या रीतींत फेरफार करण्याचा हाय् कोर्टाला अधिकार द्यावा. हें काम निःसंशय बऱ्याच अडचणीचें आहे तथापि त्याबदलची जबाबदारी घेण्यास या कोर्टाचे जज्ज तयार आहेत, कारण त्यांची अशी खात्री झाली आहे कीं स्मॉल काज कोर्टाच्या कारणांसाठीं मनाजोगी व योग्य अशी काम चालविण्याची रीति स्थापन करण्यास हाच खरा उपाय आहे."

३. या मसुद्याचें ४ थें कलम, मुंबईच्या स्मॉल कॉज कोर्टाचे चीफ् जज्ज मिस्टर डब्ल्यू ई. हार्ट यांनीं मुंबई सरकारास पाठविलेल्या पत्रांतील अभिप्रायावरून केलें आहे; तो अभिप्राय येणेंप्रमाणें:—

"१६. विद्यमान आक्टाची सुधारणा करण्याच्या संबंधानें आह्मांस असें वाटतें कीं फिर्यादीचें कारण कोर्टाच्या हुकुमतीच्या आंत उपस्थित झालें असून त्या फिर्यादीच्या कारणावरून प्रत्येक मनुष्यावर निरनिराळी जबाबदारी असलेल्या दाव्यांमध्यें पहिल्या चौकशीच्या वेळीं किंवा त्यापूर्वी वादीला, कोर्टाच्या हुकुमतीच्या बाहेर राहणाऱ्या कोणत्याहि प्रतिवादीचें नांव काढून टाकण्याची व त्या हुकुमतीच्या आंत जे प्रतिवादी राहत असतील तेवढ्याच प्रतिवादींवर हुकुमनामा घेण्याची परवानगी जेणेंकरून कोर्ट देऊं शकेल अशा प्रकारें १८ वें कलम सुधरावें.

"१७. असें वारंवार घडून येतें कीं फिर्यादीचें कारण सर्वस्वी कोर्टाच्या हुकुमतीच्या आंत उपस्थित झालें असून त्या फिर्यादीच्या कारणाच्या संबंधानें जतीमतीनें व प्रत्येकीं जबाबदार असणारे सगळे प्रतिवादी कोर्टाच्या हुकुमतीच्या आंत राहतात अशा भरंवशावर वादी हा, पूर्वी कोर्टाची परवानगी घेतल्यावांचून, त्या सर्व प्रतिवादींवर फिर्याद मांडतो. परंतु तो त्यांजवर समन्स बजाविण्यास निघाला ह्मणजे त्याला असें आढळून येतें कीं त्यांपैकीं कांहींजण कोर्टाचे हुकुमतीचे आंत जरी राहतात तरी कांहींजण फिर्याद मांडण्याचे पूर्वीच मुंबई सोडून गेलेले असल्यामुळें त्यांना समन्स बजाविल्याची गोष्ट शाबित करतां येत नाहीं. विद्यमान कायद्याप्रमाणें ह्मटलें ह्मणजे एकंदर प्रतिवादींवर मिळून त्यानें केलेला सदर्हू प्रकारचा दावा सर्वस्वी निष्फळ होतो आणि वादी हा, दावा मुदतीबाहेर गेला नसल्यास, कोर्टाची परवानगी घेऊन एकंदर प्रतिवादींवर अगर, कोर्टाची परवानगी न घेतां, हुकुमतीच्या आंत राहत असतील तेवढ्याच प्रतिवादींवर नवीन दावा मांडण्याच्या खर्चांत येतो. परंतु बहुतेक प्रसंगीं हाहि उपाय करण्याची सवड वादीस राहत नाहीं व त्याचा सगळा दावा बुडतो, कारण नवीन दावा करण्यास मुदत राहत नाहीं. हल्लीं जी सुधारणूक करण्याचें योजिलें आहे ती सदर्हू कलमाच्या (क) रकमेनंतर एक विशेष ठराव दाखल करून करितां येईल व तिच्या योगानें वादीला निदान हुकुमतीच्या आंत राहणाऱ्या प्रतिवादींवर तरी मूळ दाव्यांत हुकुमनामा मिळवितां येईल."

परंतु अयोग्य रीतीनें निरनिराळे दावे आणण्याचे प्रसंग टाळण्यासाठीं असें ठरविलें आहे कीं ही सदरीं सांगितलेली सवलत वादीस घेणें असल्यास त्यानें कोर्टाच्या हुकुमतीच्या आंत न राहणाऱ्या प्रतिवादींवरील आपला दावा सोडून दिला पाहिजे.

४. या मसुद्याचें कलम ९ हें मिस्टर हार्ट यांच्या सदरीं सांगितलेल्या पत्रांतील अभिप्रायावरून सन १८८७ च्या प्रॉव्हिन्शियल स्मॉल कॉज कोर्ट आक्टाच्या २३व्या कलमाच्या आधारावर रचलें आहे; तो अभिप्राय येणेंप्रमाणें :—

"२०. शिवाय, हुकुमतीच्या प्रश्नावर माझें व या कोर्टाच्या इतर जज्जांपैकीं कांहींजणांचें असें मत आहे कीं स्थावर मिळकतीवरील हक्काचा कोणताहि प्रश्न ज्या दाव्यांत उपस्थित होईल तशा दाव्यांचा इन्साफ करण्याचा अधिकार या कोर्टाला जेणेंकरून प्राप्त होणार नाहीं अशा प्रकारें १९ वें कलम सुधरावें. रकमा (ड), (इ), (फ) व (ग) यांजवरून स्थावर मिळकतींतील हक्क ठरविण्याबाबदचे दावे घेण्याची आम्हांस मनाई आहे. याचा एक हेतु निःसंशय असा आहे कीं स्मॉल कॉज कोर्टाचा वेळ किरकोळ दाव्यांचा जलदी निकाल करण्यामध्यें जावयाचा तो, स्थावर मिळकतीवरील हक्कासंबंधी जे प्रश्न दिसण्यांत क्षुल्लक असले तथापि परिणामीं फार महत्वाचे असण्याचा संभव असतो, व त्यामुळें ज्यांच्या संबंधानें साधारणतः दोन्ही पक्षांकडून फार तक्रार चालविण्यांत येत असून ज्यांचा क्वचितच संक्षिप्त रीतानें निकाल करतां येतो, अशा प्रश्नांचा निकाल करण्यासाठीं प्रायशः फार मुदतीपर्यंत चालावयाच्या चौकशींत जाऊं नये. परंतु विद्यमान कायद्याअन्वयें, ज्यांत प्रतिवादी हक्काचा प्रश्न काढतो अशा एखाद्या दाव्यांत ( उदाहरणार्थ ) भाड्याबदलच्या दाव्यांत सदर्हूप्रमाणेंच फार वेळ जाण्याचा संभव असतो. १९ व्या कलमाच्या साधारण धोरणाकडे, व स्थावर मिळकतींतील हक्क ठरविण्याची हुकुमत कोर्टास मुद्दाम दिली नसतांहि त्या कोर्टास, ज्यांत सदर्हू प्रकारचे हक्क पर्यायानें गर्भित असतात आणि जे बहुतेक बाबतींमध्यें, कायदे करणाऱ्या मंडळीनें देण्याविषयींचा प्रत्यक्ष मनाई केलेल्या प्रकारचा फैसला पर्यायानें मिळविण्याचा केवळ प्रयत्न करून पाहावा याच हेतूनें उपस्थित करण्यांत येतात, अशा प्रश्नांचा निकाल करावयास लावणें या परस्परांस विरुद्ध असलेल्या गोष्टींकडे, लक्ष्य देऊन पाहिल्यावरून आम्हांपैकीं कांहींजणांस असें वाटतें कीं कोणत्याहि दाव्यांत हक्काचा प्रश्न खरोखर गर्भित आहे अशी कोर्टाची खात्री झाली म्हणजे लगेच, या दाव्याचे बाबतींत आपणास हुकुमत नाहीं असें कोर्टास म्हणतां आलें पाहिजे. व ही गोष्ट (ग) रकमेंत 'किंवा असे कोणतेहि हक्क अगर हितसंबंध यांच्या संबंधाचा कोणताहि प्रश्न ज्या दाव्यांत उपस्थित होइल ते दावे' असे किंवा याच मतलबाचे दुसरे शब्द ज्या... दाखल केले असतां सिद्धीस नेतां येईल.

२१. पण या वरील मुद्यावर आम्हां सर्वांचें एक मत आहे असें नाहीं हें कळविणें मला भाग आहे. चवथे जज्ज मेहरबान हार्मसजी दादाभाई हे पूर्वी वकील असून हल्लीं या कोर्टाचे जज्ज असल्यामुळें ते फार अनुभविक अमलदार आहेत. व यास्तव त्यांचें मत विशेष महत्वाचें आहे त्यांचें असें म्हणणें आहे कीं जेणेंकरून या कोर्टाची हुकुमत कमी न होतां कांहींसी ज्यास्त वाढेल त्या प्रकारें १९ व्या कलमाची सुधारणूक झाली पाहिजे; कारण या कोर्टास निकाल करण्याची हुकुमत नाहीं अशा फिर्यादीच्या कारणांवरून उपस्थित झालेल्या लहान दाव्यांतील गोरगरीब वादींस हाय कोर्टांत दावा चालविण्यासाठीं लागणारा खर्च करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें त्यांना न्याय मिळण्यास मार्ग नाहीं असा आमच्या कोर्टाच्या हुकुमतीची जी इयत्ता आधींच ठरविली आहे तिचा परिणाम झाला आहे. या संबंधानें त्यांच्याच शब्दांचा उतारा येथें दिल्यास बरें असें वाटल्यावरून तो उतारा खालीं दिला आहे :—

'इतर बाबतींच्या संबंधानें सूचना मागविल्या आहेत त्या अर्थीं विद्यमान कायद्यांत जें मोठें व्यंग आहे तें ठळक रीतीनें सरकारच्या नजरेस आणण्याची मी ही संधी घेतों. सन १८८२ च्या १९ व्या आक्टाच्या १९ व्या कलमावरून, इतर बाबतींबरोबर, खालीं लिहिलेल्या वर्गाच्या दाव्यांची चौकशी करण्याचा अधिकार नाहीं, म्हणजे :—

(१) स्थावर मिळकत परत मिळण्याकरितां दावे;
(२) स्थावर मिळकतीवरील इतर कोणताहि हक्क ठरविण्याकरितां दावे;
(३) जनरल आव्हरेज नुकसानीबदल व समुद्रावर जाणाऱ्या येणाऱ्या जहाजांवरील विम्याच्या पालिसीसंबंधी दावे;
(४) भागी मोडण्याकरितां अथवा भागीच्या कामांचा हिशेब होण्याकरितां दावे;
(५) अब्रू घेण्यानें, तुफानानें, द्वेषबुद्धीनें, फिर्याद चालविण्यानें अगर लग्न करण्याचा करार मोडल्यानें झालेली नुकसानी भरून मिळण्याचे दावे.

'हे दावे हाय कोर्टांत मांडण्यांत येत नाहींत व याचें कारण उघड आहे. तें असें कीं नुकसान झालेल्या पक्षकारांना हाय कोर्टांत फिर्याद चालविण्याचें सामर्थ्य नसतें. व त्यामुळें अशा बाबतींत व्यवहारीक रीतीनें पाहतां, न्याय मिळण्यास मार्ग नाहीं असें झाल्यासारखें होतें. या कोर्टास सदर्हू प्रकारचे दावे घेण्याची पूर्वीं हुकुमत होती परंतु ती सन १८८२ च्या सदर्हू आक्टावरून काढून घेण्यांत आली.'

"२२. मेहरवान हार्मसजी यांनीं केलेल्या सूचनेस एक अडचण आहे व ती मोठी असून माझ्या समजुतीप्रमाणें अनिवार्य आहे. ती ही कीं या कोर्टाच्या जज्जांची संख्या वाढविल्यावांचून या कोर्टाला अशा खटल्यांचा निकाल करण्याचें काम पतकरून मूळ इरादाप्रमाणें, ह्मणजे, लहान दाव्यांचा जलद निकाल करण्यासाठीं संक्षिप्त रीतीनें काम चालविणारें कोर्ट ह्मणून, राहतां येणार नाहीं. हल्लीं जी या कोर्टाची रचना आहे त्याप्रमाणें ह्मटलें ह्मणजे जज्जांना फार मुदतीपर्यंत चालणाऱ्या खटल्यांचा इन्साफ करण्यास वेळ नाहीं व तसेंच कोर्टाच्या कचेरीचें एस्टाब्लिशमेंटहि लांब व घोटाळ्याचे हिशोब घेण्यास पुरेसें नाहीं. मेहरवान हार्मसजीनीं ज्या दाव्यांचा उल्लेख केलेला आहे व ज्यांची चौकशी करण्याचा अधिकार आह्मांस विद्यमान आक्टावरून येत नाहीं तशा कांहीं दाव्यांचा आह्मीं जुन्या आक्टाअन्वयें इन्साफ करीत असूं ही गोष्ट खरी आहे. परंतु अशा दाव्यांच्या इन्साफांत हमेश कित्येक दिवस जात असत असा त्या संबंधानें माझा अनुभव आहे. विद्यमान आक्टावरून आमची पैशासंबंधी हुकुमत वाढवून दुप्पट करण्यांत आली. यामुळें व आमच्या कोर्टांत वर्षानुवर्ष दाव्यांची संख्या वाढत असल्यामुळें आणि कोर्टाच्या जज्जांची संख्या वाढविण्याच्या संबंधानें कांहींच विचार न झाल्यामुळें, काम इतकें वाढलें कीं तेणेंकरून, ज्यांचा इन्साफ करण्यास अतिशय वेळ लागावयाचा असे खटले, होईल तेथवर, न घेण्याचें ठरविणें अगदी जरूर पडलें. व १९व्या कलमावरून आमच्या हुकुमतीची जी मर्यादा ठरविली आहे तिचा मूळ हेतूहि हाच असावा अशी माझी समजूत आहे. लहान रकमेचीं कर्जें वसूल करण्याशीं ज्यांचा बहुतकरून संबंध असतो अशा लहान दाव्यांचा थोडक्या खर्चानें, जलद व अखेरचा निकाल करण्यासाठीं संक्षिप्त रीतीनें काम चालविणारें कनिष्ट व अतिशय जरूरीचें कोर्ट या नात्यानें आमच्या कोर्टाचा लोकांना सर्वसाधारण उपयोग होतो या गोष्टीकडे लक्ष्य देऊन माझें ह्मणणें असें आहे कीं सर्वत्रांना थोडक्या खर्चानें न्याय देण्याविषयींची माझी इच्छा इतरांहून कमी आहे असें नाहीं तथापि, जज्जांची संख्या व आफिस एस्टाब्लिशमेंट वाढविण्यांत येत नसेल तर या कोर्टाच्या हुकुमतींत सदर्हू प्रकारच्या दाव्यांचा समावेश करण्याविषयीं मेहरवान हार्मसजीनीं केलेली सूचना ग्रहण करण्यास, बहुतेक दाव्यांतील पक्षकारांचा फायदा व्हावा या हेतूनें, मी अतिशय नाखुष आहें. परंतु सदर्हूप्रमाणें जज्जांची संख्या व एस्टाब्लिशमेंट वाढविण्यांत येत नसून, मिळकतीचा कबजा व तत्संबंधी नुकसान व खर्च मिळणें वगैरेविषयींच्या लहान खटल्यांमध्यें हाय् कोर्टांत दावा चालविण्यासाठीं लागणारा खर्च करण्यास असमर्थ असलेल्या गोरगरीब वादींच्या हितासाठीं मेहरवान हार्मसजींची सूचना अमलांत आणणें योग्य वाटल्यास, याप्रमाणें केल्यानें जें काम वाढेल त्या कामाचा निकाल करतां येण्यासाठीं या कोर्टाच्या हुकुमतीची पैशाच्या संबंधाची मर्यादा कमी करणें जरूर पडेल असें मला वाटतें."

९. या मसुद्याच्या ७व्या कलमांत सदर्हू आक्टाच्या ३८व्या कलमाची जी सुधारणूक केली आहे ती मिस्टर हार्ट यांच्या वर सांगितलेल्या पत्रांतील एका पारिग्राफांत सुचविल्यावरून केली आहे; तो पारिग्राफ येणेंप्रमाणें:—

"२३. आह्मां एंकदर जज्जांस दुसरी एक सूचना करावीसी वाटते ती ही कीं नवीन इन्साफासाठीं अर्जी करणें ती आठ दिवसांच्या आंत केली पाहिजे असा जो मुदतीच्या संबंधानें ठराव आहे तो एकतर्फी केलेल्या हुकुमनाम्यांच्या व हुकुमांच्या, किंवा हजर राहण्यास कसूर झाल्यामुळें केलेल्या हुकुमनाम्यांच्या व काढून टाकलेल्या दाव्यांच्या बाबतींत लागू करावयाचा नाहीं असें जेणेंकरून व्यक्त होईल त्या प्रकारें ३७व्या कलमाची सुधारणूक करावी. एकतर्फी निकाल केलेल्या दाव्याच्या प्रसंगीं नवीन इन्साफासाठीं अर्जी करण्याकरितां, मुदतीविषयींच्या आक्टांतील ठरावावरून ज्यास्त मुदत ठरविली आहे, परंतु तो ठराव सदर्हू कलमावरून रद्द होतो असें दिसून येतें. त्या कलमाचा शब्दशः अर्थ केला तर देखील त्यावरून असें होतें कीं एकतर्फी हुकुमनाम्याच्या प्रसंगीं, नवीन इन्साफासाठीं अर्जी करण्याची मुदत संपून गेल्यानंतर बराच काळपर्यंत मूळ दावा झाल्याची प्रतिवादीस माहिती सुद्धा नसली तथापि त्यानें सदर्हू प्रकारची अर्जी करणें ती हुकुमनाम्याच्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंतच केली पाहिजे. यास्तव आह्मी जी सदरीं सूचना केली आहे ती सिद्धीस नेण्यासाठीं त्या कलमांत 'दाव्यांतील' व 'दाव्यामध्यें' या शब्दांपूर्वीं 'तकरारीच्या' हा शब्द दाखल केला असतां बस होईल असें मला वाटतें. व असें झालें ह्मणजे विनतकरारीच्या बाबतींत पुनः चौकशी करण्यासाठींच्या अर्ज्या, त्या किती मुदतीच्या आंत केल्या पाहिजेत या संबंधानें मुदतीविषयींच्या साधारण कायद्याखालीं येतील. मात्र अशी अर्जी करणाऱ्या पक्षकारास हजर न होण्यास सबळ कारणें होतीं अशी कोर्टाची खात्री झाली नाहीं तर ती अर्जी घेण्यास नाकारण्याबाबद विचार करण्याचा अधिकार कोर्ट अलबत चालवील, व केवळ अर्जी केली आहे एवढ्याच गोष्टीवरून हुकुमनाम्याची बजावणी तहकूब झालीच पाहिजे असें होणार नाहीं."

६. या मसुद्याच्या ७ व्या कलमांतील इतर ठराव, मद्रास सरकारचें पत्र नंबर १७७४ (ज्युडिशियल), तारीख ३ माहे सेप्टेंबर सन १८९१, याच्या खालीं दिलेल्या पारिग्राफाच्या आधारावर केले आहेत; तो पारिग्राफ येणेंप्रमाणें:—

"३. ज्या ज्या अधिकाऱ्यांचीं मतें विचारण्यांत आलीं त्यांच्या त्यांच्या पत्रांवरून असें दिसून येईल कीं त्या सर्वांचा खालीं लिहिल्याप्रमाणें साधारण एकसारखाच अभिप्राय आहे, तो असा—

(१) रुपये १००० व रुपये २००० या दरमियानच्या किंमतीच्या दाव्यांचा संक्षिप्त रीतीनें इन्साफ करण्याचा जो अधिकार स्मॉल कॉज कोर्टास हल्लीं आहे तो त्या कोर्टाचा अधिकार कायम राहवा;

(२) १००० रुपयांहून अधिक किंमतीच्या सर्व दाव्यांच्या प्रसंगीं हायू कोर्टास अपील चालावें;

(३) सन १८८२ च्या १९ व्या आक्टाचीं कलमें ३८ तागायत ४० रद्द करावीं.

हा अभिप्राय आली जनाब इन् कौन्सिल यांस सर्वतोपरि मान्य आहे, व विशेषेंकरून त्यांतील पहिली रकम तर त्यांना फारच पसंत आहे. १००० रुपयांहून अधिक किंमतीच्या दाव्यांमधील हुकुमनाम्यांवर यथापद्धति अपिलें करावयाचीं त्या संबंधानें हायू कोर्टाच्या पत्राच्या ६ व्या पारिग्राफाकडे लक्ष्य द्यावें अशी विनंति करण्याविषयीं मला हुकुम झाला आहे. त्या पारिग्राफावरून असें दिसून येईल कीं स्मॉल कॉज कोर्टांत पुराव्याचीं टिपणें लिहिण्याची जी हल्लीं पद्धत आहे ती अपीलेट कोर्टाच्या कारणांसाठीं बस आहे असें हायू कोर्टाचें मत आहे."

७. या मसुद्याचीं कलमें ८ व ९ हीं मद्रास सरकारच्या सूचनेवरून दाखल केलीं आहेत.

तारीख ११ माहे जानेवारी सन १८९३.

(सही) आलेक्स. एड्व. व्हिलर.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.